# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 25/03/2020 (बुधवार)

(सायंकाळ)

### अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारु बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. काटोल :– दिनांक 24/03/2020 रोजी काटोल पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा डोंगरगाव येथे काही इसम गावठी मोहाफुल हातभट्टीची दारू गाळण्याचा अवैधरीत्या व विनापरवाना व्यवसाय करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे काटोल पोलीसांनी नमुद घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे– राजपाल संतोष मारवाडी, रा. डोंगरगाव हा दारू गाळतांना दिसुन आला व पोलिसांना पाहुन फरार झाला. आरोपीच्या घराची दारूबाबत घरझडती घेतली असता एका प्लॉस्टीक ड्रम मध्ये 80 लिटर गावठी मोहाफुल दारू ड्रमसह कि. 8500/ रू. मोहाफुल सडवाने भरलेले 16 माठे ड्रम ज्यात 1600कीलो मोहाफुल रसायन सडवा ड्रमसह कि 1,68,000/–रु. व भट्टी गाळण्याचे साहीत्य ड्रम जळावु इधंन कि. 6,500/–रु. असा एकुण कि. 1,83,000/–रू. चा माल अवैधरित्या मिळुन आला.

सदर प्रकरणी सर तर्फे सहायक फौजदार जवाहर चव्हाण येथे आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले असुन आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. पुढील तपास सहायक फौजदार जवाहर चव्हाण 9545363121हे करीत आहे.



# अकस्मात मृत्यू

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावर मौजा सर्वोदय नगर पाण्याच्या टाकीजवळ सावनेर येथे फिर्यादींची भाची नामे– कु. सुषमा घनश्याम नारेकर, वय 35 वर्ष, रा. सर्वोदय नगर, पाण्याच्या टाकीजवळ सावनेर हिची अचानक प्रकृती खराब झाल्याने तिला उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय सावनेर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– युवराज माणिरामजी बनकर, वय 48 वर्ष, रा. सर्वोदय नगर पाण्याच्या टाकीजवळ सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार यादव हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर